

आजचा दिनविशेष

१९३५ : भारताचे पहिले पब्लिक स्कूल द डून स्कूल सुरू झाले.

दैनिक **लोकआरंभ** लोकक्रांतीचा आरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | सोमवार १५ सप्टेंबर २०२५ | अंक २६६ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु







# हाकेंचं लग्नाबाबत वादग्रस्त वक्तव्य; जरांगे पाटील प्रचंड संतापले

**ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी लग्नाबाबत वादग्रस्त केलं होतं, त्यावर आता मनोज जरांगे पाटील यांची प्रतिक्रिया समोर आली आहे, त्यांनी चांगलंच सुनावलं आहे.**

**यावेळी बोलताना त्यांनी अप्रत्यक्षपणे धनंजय मुंडे आणि छगन भुजबळ यांच्यावर देखील निशाणा साधला आहे.**

**लक्षात ठेवा, तुमच्या लेकीबाळी मी माझ्या लेकीबाळी प्रमाणे समजतो. अजित पवारांचे दोन कार्यकर्ते धनंजय मुंडे, आणि छगन भुजबळ यांनी त्यांना हाताखाली धरलं आहे,**

ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी लग्नाबाबत वादग्रस्त वक्तव्य केलं होतं, त्यामुळे संपूर्ण मराठा समाज आक्रमक झाला आहे. लक्ष्मण हाके यांच्या या वादग्रस्त विधानाचा निषेध करण्यात येत आहे, दरम्यान यावर आता मनोज जरांगे पाटील यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे, त्यांनी लक्ष्मण हाके यांना इशारा देतानाच मंत्री छगन भुजबळ आणि आमदार धनंजय मुंडे यांच्यावर देखील अप्रत्यक्ष निशाणा साधला.



## नेमकं काय म्हणाले जरांगे पाटील?

मनोज जरांगे पाटील यांनी लक्ष्मण हाके यांच्या वक्तव्याचा जोरदार समाचार घेतला आहे. मी आतापर्यंत त्याच्यावर काही बोललो नाही, तुम्हाला आतापर्यंत बोललो नाही, लक्षात ठेवा, तुमच्या लेकीबाळी मी माझ्या लेकीबाळी प्रमाणे समजतो. अजित पवारांचे दोन कार्यकर्ते धनंजय मुंडे, आणि छगन भुजबळ यांनी त्यांना हाताखाली धरलं आहे, त्यांना काही बोलता येत नाही, म्हणून ते यांच्या तोंडून त्यांची भाषा वधून घेत आहेत. त्यांचे विचार बीड जिल्ह्यात येऊन पाजाळ्याचे काम करू नका, त्या दोघांना बोलता येईना म्हणून, त्या दोघांनी तुम्हाला



## धनगराची लेक आहे, ती आमची पण लेक आहे.

परंतु लक्ष्मण हाके यांच्या ते काही लक्षात येत नाही, गरीब धनगर समाज बांधवांच्या हे लक्षात आलेलं आहे. म्हणून धनगर लोक त्यांना जवळ करत नाही, मी त्यांच्यावर काहीच बोललो नव्हतो, त्याला देखील हेच कारण होतं, ते म्हणजे आम्हाला माहिती आहे, की यांचे गढूळ विचार आहेत. कुणाच्याही लेकीबाळीवर आम्ही आतापर्यंत बोललेलो नाही, कारण धनगराची लेक आहे, ती आमची पण लेक आहे. धनगर बांधवांच्या हे लक्षात आलेल आहे, की हे विनाकारण भांडण विकत घेत आहेत, अशा शब्दात मनोज जरांगे पाटील यांनी लक्ष्मण हाके यांच्यावर निशाणा साधला आहे.तुम्ही वैचारिक विरोध करत होता, आरक्षणाबद्दल बोलत होता, तोपर्यंत ठीक होतं. परंतु आता तुम्ही आमच्या अस्मितेपर्यंत पोहोचला आहात, त्यामुळे तुम्ही कोणाच्या विचाराचे माणूस आहात? हे आम्हाला कळालं आहे, असंही यावेळी जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.पहिल्यांदा जशा दंगली केल्या तुमचे लोक घालून आणि त्या दंगली तुम्हीच केलेले आहेत असा देखील आरोप जरांगे पाटलांनी भुजबळ यांच्यावर केला आहे.

## दिंद्रुडकरांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश; माजलगाव मतदारसंघात संघटन बळकट!

बीड, प्रतिनिधी – हिंदुरुदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांच्या विचारधारेने प्रेरित होऊन तसेच उपमुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख मा. एकनाथजी शिंदे आणि खासदार श्रीकांतजी शिंदे यांच्या विकासाभिमुख कार्यपद्धतीवर विश्वास ठेवत माजलगाव विधानसभा मतदारसंघातील दिंद्रुड गावातील अनेक कार्यकर्त्यांनी काल दि. 13 सप्टेंबर 2025 रोजी दुपारी 12.00 वाजता शिवसेना मध्यवर्ती कार्यालय येथे जाहीर प्रवेश केला. या प्रवेश सोहळ्यात दीपक चोरघडे, पृथ्वीराज ठोंबरे, गणेश



मायकर, श्याम शेजुळ, व्यंकट ठोंबरे, सतीश देवकर, महादेव कांबळे आणि ज्ञानेश्वर कटारे यांचा समावेश होता. हा प्रवेश शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, जिल्हाप्रमुख स्वप्निल भैय्या गलधर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. याप्रसंगी युवासेना जिल्हाप्रमुख रविराज बडे, तालुकाप्रमुख ज्ञानेश्वर (माऊली) गोंडे, रामदास ढगे, संदीप माने, शिवाजी गोंडे, मसुराम गोंडे यांच्यासह शिवसेनेचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. दिंद्रुड गावातील या कार्यकर्त्यांच्या प्रवेशामुळे माजलगाव मतदारसंघातील शिवसेनेचे संघटन अधिक सक्षम व बळकट झाल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत असून, नव्याने सामील झालेल्या शिवसैनिकांचे स्वागत जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर यांनी मनःपूर्वक स्वागत केले. ooooo

## जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या रिंगणात तीन पत्रकार उतरणार

पाटोदा प्रतिनिधी –पाटोदा :जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचा बिगुल केव्हाही वाजणार असल्याने राजकीय वर्तुळात चैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे. आपले राजकीय अस्तित्व दाखवण्यासाठी तसेच नवनिर्वाचित उमेदवारी मिळवण्यासाठी इच्छुकांनी दिग्गज नेत्यांच्या दाराशी धाव घेतली आहे. तालुक्यातील महत्त्वाच्या जागांसाठी इच्छुक कार्यकर्ते, माजी पदाधिकारी व नवे चेहरे यांच्याकडून मोठ्या प्रमाणावर हालचाली सुरू असून मुलाखती व बैठकींचे सत्र वाढले आहे. उमेदवारी निश्चित करण्यासाठी राजकीय पक्षांच्या गोटात चर्चा तापल्या आहेत. पक्षीय समीकरणे, जातीय गणिते आणि स्थानिक मतदारसंघातील मतदारसंघटन या तिन्ही घटकांचा बारकाईने विचार करूनच तिकीट वाटप होणार असल्याचे समजते. त्यामुळे इच्छुकांना उमेदवारी मिळावी यासाठी स्थानिक पातळीवरील संपर्क वाढवण्यासोबतच दिग्गज नेत्यांना पटवून देण्याची चढाओढ सुरू आहे. दरम्यान, ग्रामीण भागातील मतदारांमध्येही निवडणुकीबाबत उत्सुकता दिसून येत असून, आगामी काळात तालुक्यातील राजकीय घडामोडींना वेग येणार आहे.

## आज होणाऱ्या बीडमध्ये बंजारा समाजाच्या विराट मोर्चात लाखोंच्या संख्येने उपस्थित रहा – विकास राठोड

बीड (प्रतिनिधी) : अंकुश गवळी राज्य सरकारने हैद्राबाद गॅझेटर तात्काळ लागू करून मराठा समाजाच्या धर्तीवर ज्या पद्धतीने अध्यादेश काढला त्याच धर्तीवर अध्यादेश काढून बंजारा समाजाचा अनुसूचित जमाती मध्ये समावेश करावा या न्याय मागणीसाठी १५ सप्टेंबर रोज सोमवार रोजी बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर आयोजित करण्यात आलेल्या विराट मोर्चात बंजारा समाज बांधवांनो लाखोंच्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन मा.विकास राठोड यांनी केले आहे महाराष्ट्र राज्य सरकारने २ सप्टेंबर २०२५ रोजी मराठा, कुणबी समाजासाठी हैद्राबाद गॅझेटर लागु करून तशा



प्रकारचा अध्यादेश काढला आहे त्याच धर्तीवर हैद्राबाद गॅझेटर लागु करून बंजारा जातीचा समावेश एस टी प्रवर्गात समावेश करावा या न्याय मागणीसाठी बीड जिल्ह्यासह राज्यातील बंजारा समाज बांधव रस्त्यावर येऊन आंदोलन करीत आहेत. हैद्राबाद गॅझेटर तात्काळ लागू करुन बंजारा समाजाचा एस टी प्रवर्गात समावेश करावा या न्याय मागणीसाठी १५ सप्टेंबर रोज सोमवार रोजी बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर बंजारा समाजाच्या वतीने विराट मोर्चाचे आयोजन करण्यात आले असून या ऐतिहासिक मोर्चात लाखोंच्या संख्येने सहभागी व्हावे. असे आवाहन शेवटी विकास राठोड यांनी केले आहे.

## बीडमध्ये बंजारा समाजाच्या मोर्चासाठी येणाऱ्या वाहनांना टोलमाफी द्या

### खा.बजरंग सोनवणे यांचे संबंधित विभागाला पत्र



बीड: बंजारा (लमाण) समाजाच्यावतीने बीड येथे दि.१५ रोजी विराट मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या मोर्चासाठी येणाऱ्या बांधवांच्या येणाऱ्या व जाणाऱ्या वाहनांना टोल माफी देण्यात यावी, असे पत्र खा.बजरंग सोनवणे यांनी मुख्य महाव्यवस्थापक व प्रादेशिक अधिकारी,राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, कोकण-भवन, मुंबई व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मुंबई, यांना दिले आहे.

खा.बजरंग सोनवणे यांनी दिलेल्या पत्रात म्हटले आहे, राज्य शासनाने दि. २ सप्टेंबर २०२५ रोजीचा शासन निर्णयानुसार हैदराबाद स्टेट गॅझेटियर स्वीकारले असून, त्या गॅझेटरमधील नोंदीनुसार बंजारा (लमाण) समाज अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गात मोडतो. मराठवाड्यातील विशेषतः तत्कालीन हैदराबाद राज्याच्या भागातील बंजारा समाजाच्या मागणीसाठी बीड जिल्हयातील संपूर्ण बंजारा समाज बांधवांनी दि. १५ सप्टेंबर रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते जिल्हाधिकारी कार्यालय, बोड येथे भव्य विराट मोर्चा आयोजित केला आहे. या मोर्चामध्ये समाज बांधव मोठ्या संख्येने आपल्या वैयक्तिक व व्यावसायिक वाहनाने सहभागी होत आहेत. यामुळे मोर्चासाठी येणाऱ्या वाहनांना टोलमाफी देने आवश्यक आहे. या निर्णयामुळे जनतेला आर्थिक दिलासा मिळेल, टोल नाक्यांवरील गर्दी कमी होईल आणि वाहतूक व्यवस्थापन अधिक सुलभ होईल . बीडकडे येणाऱ्या व जाणाऱ्या सर्व वाहनांना टोलमाफी देण्याच्या संदर्भात तातडीने आवश्यक आदेश निर्गमित करावेत. असेही त्यांनी पत्रात म्हटले आहे. दोन दिवसापूर्वी बीड येथे बंजारा समाजातील तरुणांनी सुरू केलेल्या उपोषणाला खा.बजरंग सोनवणे यांनी भेट देत उपोषणकर्त्यांशी संवाद साधला होता. याच ठिकाणाहून आपण बंजारा समाजाच्या सोबत असून आपला या मागणीला पाठिंबा असल्याचेही जाहीर केले होते. यानंतर टोलमाफीसाठी पत्र देऊन सामन्य नागरिकांना टोलपासून आर्थिक झळ बसू नये यासाठी पत्र दिले आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

सोमवार १५ सप्टेंबर २०२५
https://lokaarambh.com



सं पा द की य

## तांब्याच्या भांड्यात ठेवलेले पाणी प्यायल्याने कोणता आजार बरा होतो?



भारतीय परंपरेत, तांब्याच्या भांड्यात ठेवलेले पाणी पिणे ही एक अतिशय प्राचीन पद्धत म्हणून ओळखली जाते. आयुर्वेद तसेच विज्ञान देखील तांब्याच्या गुणधर्मांना ओळखते. तांब्यामध्ये असलेले अँटी-बॅक्टेरियल, अँटी-ऑक्सिडंट आणि अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म आरोग्यासाठी फायदेशीर आहेत. हे पाणी पिणे काही आजारांमध्ये देखील फायदेशीर आहे. परंतु तांब्याच्या भांड्यातील पाणी प्रत्येकासाठी फायदेशीर नसते. तांब्याच्या भांड्यात पाणी प्यायल्याने कोणते आजार बरे होतात ते जाणून घेऊयात. तसेच तांब्याच्या भांड्यातील पाणी कोणी पिऊ नये हे देखील पाहुयात. तांब्याच्या भांड्यात पाणी पिल्याने कोणता आजार बरा होतो?

तांब्याच्या भांड्यात पाणी पिल्याने गॅस, ॲसिडिटी, बद्धकोष्ठता, अशक्तपणा आणि संधिवात यासारख्या अनेक आजारांपासून आराम मिळतो. तांब्यामध्ये असलेले अँटी-बॅक्टेरियल आणि अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म पचन सुधारतात आणि शरीराला डिटॉक्सिफाय करण्यास मदत करतात. ते लोहाचे चांगले शोषण करण्यास मदत करते, जे अशक्तपणामध्ये फायदेशीर आहे. दाहक-विरोधी गुणधर्मांमुळे, ते संधिवाताची सूज आणि वेदना कमी होते.सकाळी रिकाम्या पोटी तांब्याच्या भांड्यातील पाणी पिण्याचे काय फायदे आहेत?


सकाळी रिकाम्या पोटी रात्रभर तांब्याच्या भांड्यात ठेवलेले पाणी पिणे अशक्तपणामध्ये फायदेशीर ठरू शकते. याशिवाय हे पाणी थायरॉईड संप्रेरकांचे संतुलन राखण्यास मदत करते. ते चयापचय व्यवस्थित ठेवते आणि शरीरातील हार्मोनल असंतुलन कमी करण्यास उपयुक्त ठरते.तांब्याच्या भांड्यात ठेवलेले पाणी कोणी पिऊ नये? गर्भवती आणि स्तनपान करणाऱ्या महिलांनी तांब्याचे पाणी पिऊ नये. ज्यांना अतिसार, उलट्या, मळमळ, गॅस, छातीत जळजळ किंवा तीव्र रक्तस्त्राव यासारखे गंभीर आजार आहेत त्यांनी तांब्याचे पाणी पिणे टाळावे. विल्सन आजाराने ग्रस्त असलेल्या व्यक्तीने, ज्याच्या शरीरात आधीच तांब्याचे प्रमाण जास्त आहे, त्यांनी देखील तांब्याचे पाणी पिऊ नये.

तांब्याच्या भांड्यातील पाणी पिण्याचे तोटे काय आहेत?

तांब्याच्या भांड्यात जास्त वेळ पाणी साठवल्याने आणि असे पाणी प्यायल्याने विषबाधा होऊ शकते. ज्यामुळे मळमळ, उलट्या, पोटदुखी आणि अतिसार यासारख्या पोटाच्या समस्या उद्भवू शकतात.

# मा आ श्री लोकनेते राणाज गजितसिह पाटील यांचा भूम दौरा

(भूम प्रतिनिधी नय्युम बेग ) भूम येथे मा आ श्री राणाजगजितसिंह_पाटील उपाध्यक्ष, महाराष्ट्र इन्सुस्टीशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्रा) नियोजन विभाग, महाराष्ट्र सरकार यांचा भूम दौरा Maha_STRIDE या महत्वकांशी प्रकल्पाअंतर्गत भूम -परंडा-वाशी या तालुक्यातील प्रकल्पाबाबत बैठकी आले असता भारतीय जनता कामगार मोर्चा धाराशिव च्या वतीने तुळजापूर विधानसभा सभेचे लोकप्रिय



आमदार श्री राणाजगजीतसिंह पाटील व जिल्हा अध्यक्ष श्री दत्ताभाऊ कुलकर्णी यांचा सत्कार करण्यात आला व भाजपाचे जेष्ठ नेते माजी आमदार सुजित सिंह ठाकुर यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील विविध समस्यांबाबत चर्चा करण्यात आली याप्रसंगी तहसील कार्यालय भूम येथे विविध प्रकल्पासंदर्भात आढावा घेण्यात आला व भूम येथील एमआयडीसी येथील विनोद जोगदंड यांचे खवा उद्योग याला भेट दिली यावेळी भारतीय जनता पार्टी चे जेष्ठ नेते व जिल्हा अल्पसंख्यांक सरचिटणीस आदम शेख, कामगार मोर्चा जिल्हाध्यक्ष रोहन जाधव, जिल्हाचिटणीस अंगद मुरूमकर, भाजपा परंडा माजी अध्यक्ष राजकुमार पाटील, समाधान बोराडे युवा मोर्चा मा.अध्यक्ष गणेश भोगील , भूम तालुका उद्योग आघाडी अध्यक्ष रमेश बगाडे, भूम शहर अल्पसंख्यांक मोर्चा अध्यक्ष महबूब शेख ,युवा मोर्चा तालुका उपाध्यक्ष धनाजी सोनवणे, युवा मोर्चा सरचिटणीस अमित पाटील, श्रीकांत सानप ,अशोक महानवर ,पांडुरंग ढगे, अमर बादेला, महादेव गपाट इत्यादी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते..!

# येणाऱ्या दसरा व दिवाळीच्या निमित्ताने तरी बीड नगर प्रशासनानी तात्काळ दखल घेऊन स्वच्छता व वीज पाणी व रस्त्याची व्यवस्था करणे गरजेचे नवनाथ अण्णा शिराळे पाटील

बीड प्रतिनिधी. बीड शहरांमध्ये सध्या जागोजागी रस्त्याची दुरवस्था झाली असून नागरिकांना चालताना नाहक त्रास सहन करावा लागत आहे खड्ड्यात रस्ता आहे की रस्त्यात खड्डे आहेत हेच समजत नाही आणि सध्या बीड शहराच्या जवळ असलेले बिंदुसरा प्रकल्प व सांडून वाहत असताना देखील बीड शहराला पंधरा ते वीस दिवसाला पाणी सोडले जाते हे दुर्दैव बिड करायचे आहे की काय असे देखील बीड शहरातील नागरिकांमधून संतापताची लाट सध्या व्यक्त होत आहे तोंडावरच दसरा व दिवाळी येऊन ठेपलेली आहे सध्या पितृ पक्ष पंधरवाडा चालू असून महिला भगिनी घरातील भांडे धूने कपडे दसऱ्यानिमित्त धुण्यासाठी काढत असतात तसेच घरोघरी रंग रगोटी देखील केली जाते परंतु पाण्याअभावी ही कशी रंगरंगोटी करावी कसे धुणे धुवावे कसे भांडे मोठे धुने करावे कसे मोठे मोठे टेबल बाकडे खुर्च्या घरातील सर्वच साहित्य पंखा सह सर्व साहित्य धुण्यासाठी पाणी लागते परंतु 15 ते 20 दिवसाला बीड शहराला पाणी सोडले जाते मग हे कसे साहित्य हे धुवायचे पाण्याअभावी तसेच ठेवायचे की काय असा प्रश्न देखील माता भगिनींना बीड शहरातील पडलेला आहे शिवसागर यांची सत्ता बीडला असल्यापासून बीड शहराला पंधरा ते वीस दिवसाला पाणी मिळत आहे आणि आता सध्या नगरपालिकेचे असलेले प्रशासक



साहेब यांनी या महत्त्वाच्या विषयाची गांभीर्याने दखल घेऊन तात्काळ दररोज बीडकरांना पाणी सोडावे असे नागरिकांमधून बोलले जात असल्याचे मा नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी प्रसिद्धी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकाच्या माध्यमातून म्हटले आहे जर येणाऱ्या दोन दिवसात जर बीड शहराला पाणीपुरवठा जर सुरू नाही केला तर बीड नगर प्रशासनाला कुलूप ठोकले जाईल असा इशारा देखील शिराळे पाटील यांनी दिला आहे याची दखल प्रशासक ओसिओ मुख्याधिकारी नगर परिषद बीड यांनी घ्यावी असे आवाहन देखील भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती मा नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी केले आहे तसेच बीड शहरातील गल्लोगल्ली मध्ये सध्या अंधाराचे साम्राज्य निर्माण झाले आहे म्हणून येणाऱ्या हिंदूंचा महत्त्वाचा असणाऱ्या या सणाच्या निमित्ताने दिवाळी आणि दसऱ्याच्या निमित्ताने तरी बीड नगर प्रशासनाने लाईटची व्यवस्था खंब्यावर लाईट लावून करावी महत्त्वाच्या ठिकाणी शहरातील प्रत्येक गल्लीमध्ये बीड शहराचे दैवत असलेला श्री खंडेश्वरी मंदिर परिसरामध्ये देखील लाईट व्यवस्था करावी महाराष्ट्राची श्री कुलस्वामिनी तुळजाभवानी यांचे ठिकाण असलेल्या बीड शहरातील खासबाग परिसरामध्ये देवीच्या परिसरामध्ये देखील नाईट ची पाण्याची व्यवस्था करावी बीड शहरातील महत्त्वाच्या ठिकाणी महत्त्वाच्या पोलवर लाईट बसवावे व रिपेरिंग दुरुस्ती करावी असे आव्हान देखील मा नवनाथ अण्णा शिराळे पाटील माजी सभापती नगरपरिषद यांनी केले आहे

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या असंघटित काम्गार विभागाचा किल्ले धारूर (बीड) येथे पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र वाटप

**आणि भव्य कामगार मेळावा आमदार मा. प्रकाशदादा सोळंकेंच्या प्रमुख उपस्थितीत कार्यकारिणी जाहीर, हजारो कामगारांचा सहभाग**






बीड प्रतिनिधी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने किल्ले धारूर, जिल्हा बीड येथे असंघटित कामगार विभागाकडून पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र वाटप व काम गार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष व उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या संकल्पनेनुसार आणि प्रदेश अध्यक्ष मनोजदादा व्यवहारे यांच्या मार्गदर्शनाखाली शहर व तालुका कार्यकारिणीची निवड करण्यात आली.या कार्यक्रमास माजलगाव म तदारसंघाचे आमदार मा. प्रकाशदादा सोळंके

प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी आपल्या भाषणात ङ्गमी व माझा पक्ष सदैव गोरगरीब व मोलमजुरी करणाऱ्या सर्व कामगारांच्या पाठीशी खंबीर उभा आहेङ्ग असे प्रतिपादन केले.यावेळी गटनेता फारुक पटेल, जिल्हा अध्यक्ष अलीम पटेल, जिल्हा निरीक्षक वसंतराज वक्ते आदींची भाषणे झाली. सलाम काझी यांच्या अध्यक्षतेखाली बाबासाहेब दराडे (उपाध्यक्ष), अशोक वेताळ, मोबीन शेख, परमेश्वर चव्हाण, इरफान शेख, जीवन बिरगड, लक्ष्मण रेड्डी, इंजिनियर साहेब, सय्यद एजाज, अन्वर शेख, सुनील हजारें, विजय म ळेकर, मोहन गायसामुद्रे यांच्यासह अनेक पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र वितरित करण्यात आले.हजारो काम गार व कार्यकर्त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाची शोभा अधिकच वाढली.

# पत्रकारांच्या समस्या सोडविण्यासाठी मी नेहमीच तत्पर

## म अ.भा.मराठी पत्रकार परिषदेच्या डिजिटल मीडिया अधिवेशनात डॉ.भागवत कराड

छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) - पत्रकार हे वर्षानुवर्ष समाजासाठी काम करतात. त्यांच्या समस्या मी नेहमीच गांभीर्याने घेत असतो. त्याम ुळे पत्रकारांच्या आरोग्यविषयक व रेल्वेविषयक समस्या सोडविण्यासाठी मी कसोशीने प्रयत्न करीन, असा विश्वास माजी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री तथा राज्यसभा खासदार डॉ. भागवत कराड यांनी व्यक्त केला.

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेशी सलग्न असलेल्या डिजिटल मीडिया परिषदेच्या पहिल्या राज्यस्तरीय अधिवेशनात डॉ.भागवत कराड बोलत होते.अध्यक्षस्थानी अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख होते.

यावेळी व्यासपीठावर परिषदेचे अध्यक्ष मिलिंद आष्टीवकर, विश्वस्त किरण नाईक, विश्वस्त शरद पाबळे,



डिजिटल मीडियाचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस प्रा.सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मंजूरभाई शेख, उपाध्यक्ष गणेश मोकाशी, गो.पी.लांडगे, लातूर विभागीय सचिव सचिन शिवशेटे, ज्येष्ठ पत्रकार धनंजय लांबे, डॉ.अनिल फळे, डॉ.मोहम्मद अब्दुल कदीर, अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्ष बालाजी सूर्यवंशी, सचिव प्रकाश भगनुरे, कार्याध्यक्ष कानिप अन्नपूर्णे, मुंबई प्रतिनिधी सुनील वाघमारे, उपाध्यक्ष महादेव जामनिक, कोषाध्यक्ष ब्रह्मानंद चक्करवार यांच्यासह मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी डॉ.भागवत कराड यांनी पत्रकारांच्या विविध सम स्यांविषयी सोडवणूक करण्यासंबंधी मार्गदर्शन केले. तसेच पत्रकारांच्या आरोग्यविषयक, रेल्वेविषयक व छोट्या-मोठ्या व्यवसायाला बळकटी देण्यासाठी मुद्रा लोन विषयी पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. प्रमुख वक्ते तुळशीदास भोईटे व रवींद्र पोखरकर यांनी मार्गदर्शन केले.

ज्येष्ठ पत्रकार धनंजय लांबे यांनी ङ्गए.आय. आणि मराठी पत्रकारिताङ्ग, या विषयावर तर डॉ.अनिल फळे यांनी ङ्गडिजिटल मीडिया : श्वास म हाराष्ट्राचाङ्ग, या विषयावर मार्गदर्शन केले. प्रमुख पाहुण्यांचे स्वागत अध्यक्ष बालाजी सूर्यवंशी,सचिव प्रकाश भगनुरे, कार्याध्यक्ष कानिफ अन्नपूर्णे, मुंबई प्रतिनिधी सुनील वाघमारे, उपाध्यक्ष महादेव जामनिक,कोषाध्यक्ष ब्रह्मानंद चक्करवार, धनंजय लांबे, डॉ. अनिल फळे, डॉ.मोहम्मद अब्दुल कदीर यांनी केले.

अध्यक्षीय समारोपात एस.एम. देशमुख यांनी डिजिटल मीडियाच्या विविध प्रश्नांना वाचा फोडली. सरकार अद्यापही यु ट्युबच्या पत्रकारांना पत्रकार मानायला तयार नाही. पत्रकारांच्या प्रश्नांसंदर्भात राज्य सरकार चालढकल करत असल्याचा आरोप त्यांनी केला. पत्रकार संरक्षण कायदा मंजूर होऊन सात वर्षे झाली. तरी सरकार अद्यापही अधिसूचना काढायला तयार नाही. पत्रकारांच्या पेन्शनचे, अधिस्वीकृतीधारक पत्रकारांचे प्रश्न प्रलंबित असल्याचेही त्यांनी सांगितले.

अधिवेशनाचे प्रास्ताविक बालाजी सूर्यवंशी यांनी तर आभार प्रकाश भगनुरे यांनी मानले. या अधिवेशनात ज्येष्ठ पत्रकार राम अग्रवाल, नागेश गजभिये, स.सो.खंडाळकर, डॉ,धनंजय लांबे, डॉ. मोहम्मद अब्दुल कदीर, जगन्नाथ सुपेकर, रमेश खोत, यांचा पत्रकारितेतील दीर्घ सेवेबद्दल सन्म ानपूर्वक सत्कार करण्यात आला. या अधिवेशनासाठी राज्यभरातील मुद्रित माध्यमे, इलेक्ट्रॉनिक मीडिया, यु ट्युब चॅनेल व पोर्टलच्या पत्रकार व संपादकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.मुळूक आणि हेवन व्हेज रेस्टोरंटचे संचालक तनय शेळके यांनी रंगमंचाचे विधिवत पूजन करून केले व कलाकारांना शुभेच्छा दिल्या.

-----

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
सोमवार १५ सप्टेंबर २०२५
https://lokaarambh.com



## युपीआयचे नवे नियम लागू, या पेमेंटच्या मर्यादेत झाली वाढ,




नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया ( एनपीसीआय ) ने उद्या १५ सप्टेंबरपासून व्यक्ती ते व्यापारी ( पी 2 एम ) देवाण-घेवाणची दैनिक मर्यादा वाढवून दहा लाख रुपये केली आहे. या निर्णय त्या क्षेत्रांसाठी मदतगार साबित होणार आहे. जेथे आधी कमी पेमेंट मर्यादा असल्याने लोकांना युपीआय वापरताना अडचणी येत होत्या.

विमा आणि गुंतवणूक
– शेअर बाजारातील गुंतवणूक आणि विम्याचा हप्ता भरण्याची मर्यादा २ लाख रुपयांवरून ५ लाख रुपये करण्यात आली आहे. परंतू एकूण दैनंदिन देवाणघेवाण १० लाख रुपयांपेक्षा अधिक करता येणार नाही.

– सरकारी देयके आणि GEM पोर्टल

– सरकारी ई-मार्केटप्लेस (GEM) पोर्टलवर प्रति देवाण-घेवाणाची मर्यादा १ लाख रुपयांवरुन वाढवून ५ लाख करण्यात आली आहे.

– यामध्ये कर भरणा आणि बयाणा रक्कम जमा करणे यांचा समावेश आहे.

ट्रॅव्हल सेक्टर
– प्रवासा संदर्भातील देवाण- घेवाणची मर्यादा आता ५ लाख रुपये ( आधी १ लाख रुपये ) झाले आहे.
– एकूण दैनिक मर्यादा 10 लाख रुपये राहणार आहे.
क्रेडिट कार्ड बिल आणि कर्जाचा हप्ता
– यूपीआयच्या माध्यमातून क्रेडिट कार्ड देयक भरण्याची मर्यादा प्रति देवाण-घेवाण मर्यादा 5 लाख रुपयांपर्यंत करण्यात आली आहे. , परंतू याची मर्यादा प्रति दिन ६ लाख रुपये आहे.
– कर्जाचे हप्ते संकलनाची मर्यादा प्रति देवाण-घेवाण ५ लाख रुपये आणि प्रति दिन १० लाख रुपये करण्यात आली आहे.
दागिने आणि बँकिंग सेवा
– यूपीआयच्या माध्यमातून दागिने खरेदी करण्याच्या मर्यादा वाढवून २ लाख रुपये प्रति देवाण-घेवाण व्यवहार करण्यात आली आहे.आणि दैनंदिन मर्यादा ६ लाख रुपये केली आहे.
– डिजिटल ऑनबोर्डिंगद्वारे मुदत ठेवींसारख्या बँकिंग सेवांसाठी,देवाण-घेवाण मर्यादा प्रति व्यवहार प्रति दिन ५ लाख रुपये करण्यात आली आहे.
व्यक्ती-ते-व्यक्ती (पी2पी) पेमेंटमध्ये कोणताही बदल केलेला नाही
– पी2पी पेमेंटची दैनिक मर्यादा पूर्वी प्रमाणे 1 लाख रुपये प्रति दिन रहाणार आहे.

## पूर परिस्थितीत प्रशासनाने सतर्क राहून काम करावे – बाळराजे पवार
# पूरग्रस्त गव्हाणथडी गावात पोहचले बाळराजे पवार

गेवराई: दि. १४ : वार्ताहर : गेवराई मतदारसंघात दोन दिवसापासून मुसळधार पाऊस पडत असून, गोदावरी नदीला पूर आलेला आहे. अनेक गावांना पाण्याचा वेढा पडला आहे. त्यामुळे, अशा कठीण प्रसंगातल्या परिस्थितीत प्रशासनाने सतर्क राहून काम करावे, अशी अपेक्षा युवा नेते बाळराजे पवार यांनी व्यक्त केली असून, पवार यांनी थेट मतदारसंघातील पूरग्रस्त गव्हाणथडी गावाला भेट देऊन गावकऱ्यांशी चर्चा केली. मतदारसंघातील माजलगाव तालुक्यातील गव्हाणथडी गावाला पाण्याचा वेढा पडल्यामुळे गावातील ग्रामस्थांचा संपर्क तुटला असल्याचे समजताच बाळराजे पवार यांनी तात्काळ गावात जाऊन पूर परस्थीची पहाणी केली. यावेळेस गावातील ग्रामस्थांशी संवाद साधत धीर दिला. यावेळी बाळराजे पवार म्हणाले की , परतीचा पाऊस सुरु असून अनेक गांवाना पुर परस्थीचा सामना करावा लागत आहे. संबधित तहसीलदार व तलाठी मंडळाधिकारी यांनी सतर्क राहून पूर परस्थीचा आढावा घेऊन गोदावरी काठावरील गव्हाणथडी गावातील नागरिकांशी संपर्क साधून त्यांना आवश्यक असलेली मदत तात्काळ करण्यात यावी, अशी मागणी बाळराजे पवार यांनी केली आहे. गेवराई विधानसभा मतदारसंघातील




माजलगाव तालुक्यातील गव्हाणथडी गावाला पाण्यांचा वेढा पडलेला आहे अशी माहीती मिळतांच बाळराजे पवार यांनी गव्हाणथडी गावाला भेट देऊन परस्थीतीची पहाणी केली आहे. यावेळी लक्ष्मण लव्हाळे,चोरे, शरद मोटे,विष्णुपंत आतकरे, बाळासाहेब उबाळे, लक्ष्मण चव्हाण, श्रीराम घाटुळ आदीसह ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी ग्रामस्थ म्हणाले की पूर परिस्थीती आली की आमच्या गावाचा संपर्क तुटतो आहे. कारण म्हणजे गावात येणारा रस्त्यावरील पूल एकदम खड्डयात आहे. संबधित पुल मोठा करणे आवश्यक आहे. यासाठी आपण प्रयत्न करावेत अशी मागणी ग्रामस्थांनी बाळराजे पवार यांच्याकडे केली. आपण स्वतःहा जातीने लक्ष घालून गव्हाणथडीचा पुला संदर्भात नक्कीच पाठपुरावा करू असा शब्द बाळराजे पवार यांनी गावकऱ्यांना दिला आहे.

# माजलगांव महेबुब नगरचा विकास रखडला नागरिक नाराज, रस्ते नाल्या बरोबर नसल्याने नागरिकात संताप वेक्त

माजलगाव प्रतिनिधी ...... महाराष्ट्र सरकारने माजलगांव नगर परिषदला खुप निधी दिले आहे पन विकास रख्खडला आहे नगर परिषद कडुण शहरात एक एक ठिकाणी तिन तिन चार चार बार कंक्रीट रस्ता तयार झाला आहे,सहा महिणे पन टिकला नाही सतत खराब झाला आहे , बोगस सीमेंट कमि म टरेल वापरल्यामुळे रस्त्याला भेंगा पढले आहे, परंतु माजलगांव शहरात म हेबूबनगर गोरगरीबाचे महेबूबनगर नवीन वस्ती दहा बारा वर्षपासुन आहे, ना त्या ठिकाणी नाल्या बरोबर आहे ना रस्त्याचे कामे झाले आहे पिण्याचे पाण्याची सोय नाही हड्डाभर पाण्यासाठी बोर पंप वाल्याना भिंक मांगुण पाणी घ्यावे लागतात , दरोज कटकट करूण पाण्याचे सोय होते नगर परिषदकडुण कसलीच व्यवस्था नाही तसेच वार्डात एक पण अंगणवाडी राशन दुकान , खंब्यावर फ़ोकस मारकुंडी नाही तसेच पावुसाचे पाणी साचते घरा समोर खुफ चिखल होते विविध सुविधाला समोरे जावा लागत आहे माजलगाव पासुन दिड कें मी अंतरावर महेबूबनगर आहे गेल्यां कितेक वर्षापासुन महेबूबनगर वासीयाचे संपने अधूरे राहिले आहे , माजलगांव मतदार संघातिल आमदार प्रकाश दादा सोळंके त्यांचे स्पष्ट दूर्लक्ष करताना दिसत आहे ,त्यामुळे



जनतेत नाराजगी पसरली आहे, म ोर्चा आंदोलन करूण व तोड़ी सांगुन नगर परिषद दुर्लक्ष करत आहे, तोड़ी लोकानी कळिवले आहे, नगर परिषद कोनी एकण्यास तयार नाही म्हणून येणारे नगर परिषद इलेक्शन मध्ये यांचा फटका मांझी नगर अध्यक्ष यांना बसणार आहे , प्रसारण माध्यमातुन माजलगांव उपजिल्हाधिकारी यांनी लक्ष देंयुन महेबूबनगरचा विकास करण्यास भांग पाढुन होणारी नागरिकाची बेज़ारी थांबवावे नंसता लोकशाही मार्गाने आपल्या कार्यालयावर विविध प्रकारचे त्रिव रूपाचे आंदोलन छेडण्यात येंईल असे नागरिकात म्हटले जात आहे,

# “आयुर्वेद सांगतो : वर्षातून एकदा (शरद ऋतू) विरेचन का आवश्यक ?







आयुर्वेद शास्त्रात पंचकर्म ही अत्यंत प्रभावी उपचार पद्धती मानली जाते. त्यातील एक महत्त्वाची प्रक्रिया म्हणजे विरेचन.

**विरेचन म्हणजे काय?**

विरेचन म्हणजे नियंत्रित पद्धतीने औषधींच्या मदतीने पित्तदोष बाहेर काढणे. यामुळे शरीरातील विकृत दोष स्वाभाविक मार्गाने बाहेर टाकली जातात.

**विरेचनाचे प्रमुख फायदे.**

1. पचन सुधारते – आम्लपित्त, अपचन, गॅस, बद्धकोष्ठता यावर मोठा फायदा होतो.
2. त्वचेचे विकार कमी होतात – एक्झिमा, ॲलर्जी, मुरुमे, सोरायसिससारखे विकार कमी होतात.
3. यकृत व पित्ताशय निरोगी राहतात – लिव्हर डिटॉक्स होऊन त्याचे कार्य व्यवस्थित चालते.
4. रक्तशुद्धीकरण – दूषित रक्त शुद्ध होऊन शरीराला नवीन ऊर्जा मिळते.
5. मानसिक शांती – राग, चिडचिडेपणा कमी होऊन मन प्रसन्न राहते.
6. अग्नि वृद्धि म्हणजे शरीरामध्ये अन्न व दोष ( विकृत अवस्थेत असल्यास आजार तयार करणारे घटक) पचवण्याची शक्ति वाढते.
7. शरीरातील दोष ( वात पित्त कफ ) प्राकृत होतात .
8. इंद्रिय मन बुद्धी शुध्दि होते त्यामुळे यांच्यात शुभ गुणांची वाढ होते.
9. वर्ण शुद्धि त्यामुळे व्यक्तीची सुंदरता नैसर्गिक पणे वाढते.
10.शरीरात बल वाढते.
11.शरीराची पुष्टि होते.
12.सन्तान प्राप्ति शक्ति वाढते,व त्याचबरोबर शुक्र शुद्ध झाल्यामुळे आनुवंशिक व्याधी पुढच्या पिढीत जाण्यापासून वाचू शकतो.
13.शरीराची कार्यकारी शक्ति वाढते.
14.म्हातारे पण उशिराने येते, मनुष्य दीर्घ आयुष्य होतो.

**विरेचन: हे शरीर-मन शुद्धीकरणाचे** एक अद्भुत साधन आहे. मात्र हे उपचार तज्ञ आयुर्वेद चिकित्सकांच्या सल्ल्यानेच घ्यावेत. काळ व प्रकृतीनुसार विरेचनामुळे शरीर निरोगी राहते आणि जीवनात नवी ऊर्जा निर्माण होते.

**श्री नारायण आयुर्वेद क्लिनिक व पंचकर्म सेंटर बिड**
**संपर्क 9145742416**

# बीड जिल्ह्यात महिला सन्मान फक्त कागदावरच का? जिल्हाधिकारी व आमदारांच्या बैठकीत महिलाचे पदे पुरुषांच्या

## सावता सेना महिला आघाडीच्या वतीने जाहीर निषेध

पाटोदा (प्रतिनिधी) महिलांसाठी आरक्षण म्हणजे सन्मान, सहभाग आणि नेतृत्वाची खरी संधी. मात्र बीड जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या आष्टी, पाटोदा, शिरुर म तदार संघाच्या विविध विकास काम ाच्या बैठकीतच या आरक्षणाचा थेट अपमान झाल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. आष्टी नगराध्यक्षा यांच्या जागी त्यांचा मुलगा, तर पाटोदा व शिरुर नगराध्यक्षांच्या जागी पत्नीऐवजी थेट पती बैठकीत विराजम ान झाले. महिला प्रतिनिधींच्या नावावर खुर्ची जिंकूनही प्रत्यक्षात पुरुषच कारभार हाकत असल्याचे हे ज्वलंत उदाहरण आहे. हा प्रकार नेम का लोकशाहीचा अपमान नाही तर काय? असा प्रश्न सावता सेना महिला आघाडीने उपस्थित केला आहे. सावता सेना महिला आघाडीच्या बीड जिल्हाध्यक्षा स्वाती कातखडे व सावता सेना महिला आघाडी आष्टी तालुका अध्यक्षा वर्षा शिंदे यांनी या प्रकारावर तिखट शब्दांत हल्लाबोल केला. महिला आरक्षणाची जागा मिळते तेव्हा आनंदाने टाळ्या वाजवतात, पण कारभार मात्र पुरुषांच्या हाती सोपवला जातो. मग महिला राजकारणात केवळ नावापुरत्या का? महिलांना खुर्ची केवळ ङ्गआरक्षणाची सोयफ म्हणून देण्यात येते, खरी सत्ता मात्र घरातील पुरुषांना देण्याचा



हा प्रकार महिलांच्या सन्मानाचा उघड उघड अपमान आहे, असे



कडाडून मत त्यांनी व्यक्त केले.त्या पुढे म्हणाल्या, जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत ही बैठक झाली. आम दार,अधिकारी आणि कर्मचारी सगळ्यांच्या डोळ्यांसमोर महिलांच्या जागी पुरुष बसलेले असताना कुणी आवाज का उठवला नाही? याचा अर्थ सत्ताधाऱ्यांच्या गप्प राहण्याला मूक संमती म्हणायचं का? व बीड जिल्हात महिला राज केवळ कागदावरच का?

महिला आघाडीच्या कार्यकर्त्यांनी रोखठोक सवाल केला की, महिला सशक्तीकरण हे केवळ भाषणापुरतेच आहे का? महिला आरक्षणाच्या नावाखाली खुर्ची मात्र घरातील पुरुषांना देणे, ही थेट लोकशाहीची पायमल्ली आहे. जर महिलांनीच स्वतः पुढे येऊन निर्णय घेतले नाहीत, तर आरक्षणाचा खरा हेतू हरवेलला आहे या संपूर्ण प्रकारामुळे सावता सेनेच्या वतीने संताप व्यक्त होत आहे. बैठकीतच महिलांचा अपमान होत असेल तर गावागावातील म हिला राजकारणी, कार्यकर्त्या आणि सामान्य महिलांचा आत्मविश्वास नेमका कुठे टिकणार? असा सवाल जनतेतूनही केला जात आहे.महिला आरक्षण म्हणजे महिलांच्या हाती सत्ता, की पुरुषांच्या हातातली बाहुली?हा सवाल सावता सेनेने उपस्थित करून प्रशासन, आमदार आणि राजकीय पक्षांना जबाबदार धरले आहे.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

सोमवार १५ सप्टेंबर २०२५
https://lokaarambh.com



# उमापूर 33केव्ही अंतर्गत मालेगाव कृषी पंपासाठी नवीन लाईन ला मंजुरी

## मा.आ.अमरसिंह पंडीत, आ.विजयसिंह पंडीत यांनी दिलेला शब्द पाळला :- जयदिप औटी

उमापूर /प्रतिनिधी

गत अनेक वर्षापासून मालेगाव, देवपींप्री, तळणेवाडी भागात विजेचा मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे अनेकवेळा मागणी करूनही महावीतरन कडून दखल घेतली जात नसल्याने या भागातील शेतकऱ्यांनी मा.आ.अमरसिंह पंडीत व आ. विजयसिंह पंडीत यांची भेट घेवुन आपली व्यथा मांडली होती या मागणीची तात्काळ दखल घेत मा. आ. अमरसिंह पंडीत व आ. विजयसिंह पंडीत यांनी मालेगाव क्रुषी पंपासाठी नवीन ११ केव्ही लाईन, देवपींप्री ला जोडलेली जुनाट लाईन बदलुन नवीन पोल व तार तसेच तळणेवाडी येथे नवीन लाईन ची मंजूर करून घेतले लवकरच काम सुरु होणार असल्याने शेतकऱ्यांनी आभार व्यक्त केले आहे.तसेच दिलेला शब्द भैय्यासाहेब व विजयसिंह पंडीत यांनी पाळला असल्याचे खरेदी विक्री संघाचे सभापती जयदिप औटी यांनी व्यक्त केले.

वादळी वारा-पाऊस यांच्यामुळे वारंवार विज खंडीत होण्याचा प्रकार कायमस्वरुपी निकाली निघण्यासाठी



उमापूर ३३ केव्ही सबस्टेशन वरून येणारी ११ केव्ही मुख्य लाईन लवकरात



लवकर नवीन करण्यात यावी. उमापूर ३३ केव्ही अंतर्गत मालेगाव



कृषी पंप साठी नवीन लाईन विस्तार करण्यासाठीची अनेक दिवसांची मागणी येथील शेतकऱ्यांनी मा.श्री.अमरसिंह पंडीत साहेब यांची भेट घेवुन नवीन कृषी पंपासाठी लाईन ची मागणी केली होती त्यावेळी अमरसिंह पंडीत यांनी शेतकऱ्यांना शब्द देवुन लवकरात लवकर काम करण्याचा शब्द दिला होता तो शब्द मा. आ. अमरसिंह पंडीत व आ. विजयसिंह पंडीत यांनी पाळला याबद्दल खरेदी विक्री संघाचे गेवराई तालुकाध्यक्ष जयदिप औटी तसेच उमापूर व मालेगाव येथील शेतकऱ्यांनी आभार व्यक्त केले आहे.

# टी ई टी ची सक्ती सर्व शिक्षकांना नको

सर्वोच्च न्यायालयाने १ सप्टेंबर २०२५ रोजी एका निकालाद्वारे यापुढे इयत्ता पहिली ते आठवीतील विद्यार्थ्यांना शिकविणाऱ्या शिक्षकांना टीचर एलिजीबिलिटी टेस्ट म्हणजेच टी ई टी परीक्षा येत्या दोन वर्षात पास होणे होणे अनिवार्य केल्याने संपूर्ण देशातील शिक्षकांचे धाबे दणाणले आहेत.महाराष्ट्र सरकारने या पूर्वीच ज्यांची नियुक्ती २०१३ नंतर झाली आहे अशा शिक्षकांसाठीच ही परीक्षा अनिवार्य असल्याचे परिपत्रक काढलेले आहे.परंतु आता न्यायालयाने सेवानिवृत्तीला पाच वर्ष शिल्लक असलेल्या शिक्षकांना यातून सूट दिलेली असून बाकीच्यांना ही परीक्षा येत्या दोन वर्षात उत्तीर्ण होणे बंधनकारक केले असून परीक्षा पास न झाल्यास शिक्षकांची सेवा समाप्त होऊ शकते असे सांगितल्याने शिक्षकांची त्रेधा तिरपीट उडालेली असून ते कमालीचे दडपणाखाली आहेत.राज्य शासनाने आता यासाठी पुढाकार घ्यायला हवा आणि शिक्षकांच्या हिताचा निर्णय घेण्यासाठी आपली भूमिका स्पष्ट करायला हवी.राज्यात सध्याला सहा लाखांहून अधिक शिक्षक असून सर्वांनीच परीक्षा देणे उचित नाही आणि तसेही दरवर्षी या परीक्षेचा निकाल दोन तीन टक्केच लागतो, एवढी कठीण ही परीक्षा असते.शिक्षक संघटनाही नाराज झाल्या असून सर्व बंधने दरवेळी शिक्षकांवरच येतात.शिक्षकांनी शिकवायचे की स्वतः परीक्षा देत बसायचे असा सवाल विचारला असून अशा परीक्षा प्रत्येक क्षेत्रात असायला हव्यात तसेच लोकप्रतिनिधींनाही किमान शैक्षणिक पात्रता पदवीधर करायला हवी. नाहीतर उठसूट कोणीही योग्य शैक्षिणक पात्रता नसताना निवडून येतो आणि मग सर्वच कठीण होऊन बसते.शासनाने शिक्षकांना योग्य न्याय मिळवून द्यायला हवा.

गणेश हिरवे जोगेश्वरी पूर्व



## माँ साहेब युथ फाउँडेशनचा गणेश उत्सव मध्ये खर्चाला आळा घालून मायेचा उपक्रम केला

दिनांक. 3/9/2025 वार बुधवार रोजी रहिमतपूर नगरीतील एक सामाजिक संस्था माँ साहेब युथ फाउँडेशन रहिमतपूर ही सतत सामाजिक उपक्रमात,कार्यक्रमात कार्यरत असणारी संस्था, गणेश उत्सव मध्ये अनावश्यक खर्च टाळून एक सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी यांतर्फे मागच्या वर्षी प्रमाणे या ही वर्षी पिंपरी येथील स्नेह आधार फाउँडेशन अर्थात आनंदाश्रम या ठिकाणी सदर संस्थेअंतर्गत अन्नदान करण्यात आले असून एक आधाराचे नाते जोडले गेले. माँ साहेब युथ फाऊंडेशन रहिमतपूर चे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, खजिनदार व नवतरुण गणेश उत्सव मंडळाचे सर्व सभासद उपस्थित होते.

## धोकादायक स्टंट रिल्स टाळायला हवेत

नवीमुंबई येथे एका पोलिस कर्मचाऱ्याचे आपल्या लहान मुलीच्या हातात कारचे स्टिअरिंग देऊन रिल बनवल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर पाहिला.हल्ली बरेचजण प्रसिद्धी झोतात येण्यासाठी जीवावर बेतनारे स्टंट आणि रील्स बनवीत असतात.मुंबईत रात्रीच्या वेळी वेगात बाईक रेस लावणे, चालत्या गाडीच्या टपावर बसणे, नाचणे, रेल्वेतून जाताना प्लॅटफॉर्म वर छापला घासणे, हुल्लडबाजी करणे यामुळे स्वतःच्या आणि इतरांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे.इतरवेळी वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या लोकांवर पोलिस कारवाई करताना दिसतात.आता खुद्द पोलिस कर्मचाऱ्यावर लहान मुलीच्या हातात स्टिअरिंग देऊन नियम मोडल्याने पोलिस आयुक्त कोणती कारवाई करतात हे बघावं लागेल.जीवावर बेतनारे स्टंट रिन्स कोणीही करू नये तसेच आता यासाठी कौन्सिलिंग सेंटर उघडावी लागती तर नवल वाटायला नको.

# शिव प्रतिष्ठानच्या वतीने दिले जाणारा समाज रत्न पुरस्कार शेख गुलाब भाई



प्रतिनिधी माजलगाव फेरोज पठाण

माजलगाव तालुक्याती शिंपीटाकळी इथला रहिवाशी व शिंपीटाकळी ग्रामपंचायत कर्मचारी गोरगरीब लोकांचे पंचायत समिती मधले सगळे कामे करणारे नेतृत्व गावाचा विकास कामात सतत अग्रेसर असणारा शेख गुलाब भाई यांनी आज शिवप्रतिष्ठांच्या वतीने दिल्या जाणाऱ्या समाज रत्न पुरस्कार मिळून आमची मान ऊचावली आहे तसेच शिंपीटाकळी गावाचे नाव शिक्षणाची पंढरी आळंदी पुणे येथे गाजवली आहे त्याबद्दल त्यांचे आभार तसेच पुढील कार्यास गावकऱ्यांनी शुभेच्छा दिल्या लखन राऊत,जिजाराम ताटे,आयुब पठाण,सय्यद फिरोज या सर्वांनी स्वागत व शुभेच्छा दिल्या

# अतिमहत्वाच्या कामाशिवाय घराबाहेर पडणे टाळा, प्रशासनाचा मोठा इशारा,

भारतीय हवामान विभागाच्या मोठ्या इशाऱ्यानंतर जोरदार पावसाला सुरूवात झालीये. मान्सून परतीच्या प्रवासावर असून पुढील दोन ते तीन दिवस अतिजोरदार पावसाची शक्यता आहे. भारतीय हवामान विभागाने घाट विभागाला ऑरेंज अलर्ट जारी केलाय. नैऋत्य मोसमी पावसाचा परतीचा प्रवास पश्चिम राजस्थानमधून सुरू झाला आहे. यंदा तीन दिवस आधीच परतीचा प्रवास सुरू झाला आहे. दरम्यान महाराष्ट्र राज्यातील चारही विभागात पुढील दोन ते तीन दिवस मेघगर्जना आणि सोसाट्याच्या साऱ्यासह अतिजोरदार तर काही ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. रात्रभर मुसळधार पाऊस सुरू होता. सकाळी अतिमुसळधार पाऊस मुंबईसह उपनगरांमध्ये सुरू झालाय. कांदिवली, बोरिवली, मालाड, अंधेरी, दहिसर, गोरेगाव, विलेपार्ले, सांताक्रूझसह मुंबई उपनगरातील अनेक भागात पाऊस सुरू झाला आहे. हवामान खात्यानेही पुढील काही तास अतिमुसळधार पावसाचे संकेत दिले आहेत. दादरमध्ये मुसळधार पाऊस सुरू असून टॅक्सी, बससाठी प्रवाशांची मोठी झुंबड उडालीये. गेल्या काही दिवसांच्या विश्रांतीनंतर पावसाचा जोर पुन्हा वाढला. सकाळपासून ढगाळ वातावरण, मुसळधार पावसाला सुरुवात झाली. पावसाचा जोर कायम राहिल्यास सखल भागात पाणी साचण्याची शक्यता आहे. भारतीय हवामान विभागाने रायगड, रत्नागिरी, पुणे, साताऱ्याच्या घाटमाथ्यावर ऑरेंज अलर्ट जारी केलाय. मराठवाड्यातीलही काही भागांमध्ये आज पावसाची हजेरी लागण्याची शक्यता आहे. कोकणात हवामान विभागाने पावसाचा अलर्ट जारी केलाय. मुंबईमध्ये रात्रभर पावसाची रिपरिप सुरूच आहे. मुंबईत सकाळी अतिमुसळधार पाऊस सुरू झाला आहे. विजांच्या कटकटाडासह पाऊस सुरू आहे पुढील काही तासांमध्ये



पावसाचा जोर अधिक होण्याची दाट शक्यता आहे. यामुळे नागरिकांनी अतिमहत्वाच्या कामाशिवाय घराबाहेर पडणे टाळावे, असे सांगितले जात आहे. जालना जिल्ह्याला 3 दिवस येलो अलर्ट जारी करण्यात आला. जिल्ह्यात तुरळक ठिकाणी विजेच्या कडकडाटासह वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता आहे. नागरिकांना सतर्क राहून योग्य ती खबरदारी घेण्याच आवाहन करण्यात आलंय. जालना जिह्लात मागील दोन दिवसापासून पूर्णतः ढगाळ वातावरण असून काल जिल्ह्याच्या अंबड तालुक्यात पावसाने जोरदार हजेरी लावत मोठ्या प्रमाणात शेती पिकाचं नुकसान केलं तर अनेक ठिकाणी नद्यांनाही मोठ्या प्रमाणात पूर आला. कुलाबा येथील प्रादेशिक हवामान केंद्राकडून जालना जिल्ह्याला पुढील 3 दिवस येलो अलर्ट जारी करण्यात आला असून विजेच्या कडकडाटासह वादळी वारा यासह पाऊस होण्याची शक्यता वर्तवली असल्याने जिल्ह्यातील नागरिकांनी खबरदारी घेऊन सतर्क राहण्याचा आवाहन जिह्ला प्रशासनाने केलं..

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com